# **फळले**

दिसले तव वदन
सुचले मज कवन
गाईले मी ते कवन
झाले तव ते भजन ||१||

दिसले तव चरण
भिजले मम नयन
ढळली आसवे दोन
सुखावले माझे मन ||२||

उघडले तू लोचन
झळले कोटी किरण
उजळे अंतःकरण
फळले माझे जीवन ||३||

– नारायण
०९/२५/२३